# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक १२.०८.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ११.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण ८,४४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये ०८ इसमांवर कारवाई करुन १३,९३५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ११२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ११,७५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ११.०८.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक १२.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०५ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— दरोड्याचे प्रयत्नातील आरोपींना अटक.**

दिनांक ११.०८.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांचे पथक हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना गुप्तबातमीदार मार्फतीने माहीती मिळाली की, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत घोरपड गावाचे रोडवरील क्रिष्णा डेव्हलपर्स यांचे मालकीचे शिवारात काही ईसम शस्त्रासह घात—पात करण्याच्या उद्देशाने जमलेले आहेत. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन, तेथे घेराव टाकुन, दरोड्याचे तयारीतील इसमांना ताब्यात घेतले व ०१ ईसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला. ताब्यातील ईसमांना त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) हर्ष उर्फ हऱ्या युवराज इंगोले, वय २५ वर्षे, रा. भवानी नगर, गणेश मंदीर समोर, पारडी ०२) रैशल रोशन मलखाम, वय २० वर्षे, रा. रामबाग, दहीकर झेंड्याजवळ, ईमामवाडा ०३) पिंटु राजु भारती, वय २९ वर्षे, रा. प्लॉट नं. २१, दत्ता चौक, गंगाबाग, पारडी ०४) अमन धर्मेंद्र गौर, वय ३० वर्षे, रा. गंगाबाग, दत्ता चौक, पारडी ५) निखील उर्फ निक्कु सुरज यादव, वय २१ वर्षे, रा. शाहु चे घरी किरायाने, रामबाग, ईमामवाडा, नागपुर असे सांगीतले. त्यांचे ताब्यातुन दोन लोखंडी चाकु, एक लोखंडी कटौनी, मिरची पावडर, दोरी, ०५ मोबाईल फोन तसेच, अॅक्टीवा मोपेड क्र. एम.एच. ४० सिजे ७४५४ व एम. एच. ४९ सिझेड १७५८, एक्स्ट्रीम मोपेड क्र. एम.एच. ४९ सिक्यु. १३८४ व सिडी डिलक्स मोटारसायकल क्र एम.एच. ३१ डिएल. १८७० असा एकुण किंमती ४,८२,७००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांचे पळुन गेलेल्या साथीदारांचे नावे विचारले असता, त्याचे नांव रवि गुप्ता उर्फ बारीक, रा. पारडी, भवानी मंदीर आवास योजनेजवळ, नागपुर असे सांगीतले. आरोपी हे घातक शस्त्रासह दरोडा टाकण्याचे तयारीत असतांना,

समक्ष मिळुन आल्याने पोलीस ठाणे नविन कामठी येथे आरोपींविरूध्द कलम ३१०(४), ३१०(५) भा.न्या.सं., सहकलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, एकुण ०५ आरोपींना अटक केलेली आहे. आरोपींना मुद्देमालासह नविन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, सपोनि. गणेश कदम, पोउपनि. विशाल सांगोडे, पोहवा. राजेंद्र टाकळीकर, राजु टाकळकर, शेख नजीर, प्रविण भगत, गणेश ठाकरे, मुकेश राऊत, रूपेश नानवटकर, अमोल भक्ते, योगेश महाजन, प्रमोद बावणे, पोअं. विशाल नागभिडकर, दिपक बावणकर, रोशन तांदुळकर व लिलाधर खिरटकर यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :– जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाहीजे आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २१.१५ ते २१.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी प्रज्वल प्रदीप जाने, वय २३ वर्षे, रा. वार्ड क्र. १, खापरखेडा हे त्यांचे मित्र हिमांशु रवि कडू, वय २३ वर्षे, २) रोहीत मेश्राम, वय २५ वर्षे, दोन्ही रा. वार्ड क्र. २, खापरखेडा व इतर मित्र हे पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत पौनीकर गल्ली, वार्ड क्र. २, कालेश्वरचे घराजवळ चहा पित गप्पा गोष्टी करीत असतांना, आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन घटनास्थळी दुचाकी गाडयांनी येऊन फिर्यादी व त्यांचे मित्रांचे अंगावर येवून हातबुक्क्यांनी तसेच हिमांशु कडू व रोहीत मेश्राम यांना जिवे ठार मारण्याचे उद्येशाने शस्त्राने दुखापत करुन गंभीर जखमी केले होते. जखमींना उपचाराकरीता न्यु लाईफ हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे आरोपींविरूध्द कलम १०९(१),११५(२),११८(२),१८९(२),१९०,१९१(३), भा.न्या.सं. सहकलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान गुन्हेशाखा युनिट क्र. ६ चे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढून, गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे चेतन सतीष पटमासे, वय ३४ वर्षे, रा. वार्ड क्र. ३, पटमासे कॉम्प्लेक्स, खापरखेडा, नागपूर यास सापळा रचुन ताब्यात घेतले. आरोपीस खापरखेडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**४) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगीरी :— वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे ११.३० वा. ते २०.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी नजिम खान जलील खान, वय ३५ वर्षे, रा. महाराणा प्रताप नगर, गोधनी, यशोधरानगर, नागपूर यांनी त्यांची बजाज प्लॅटीना मोटारसायकल क्र. एमएच ३१ सिई १५४५ किंमती १०,०००/—रू. ची पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत राणी दुर्गावती चौक, रिगल सेलीब्रेशन जवळील एटीएम समोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व गोपनीय माहितीवरून आरोपीस निष्पन्न करून, आरोपी नामे प्रफुल्ल गणेश कोहाड, वय २० वर्षे, रा. प्रेम नगर, झेंडा चौक, शांतीनगर, नागपुर यास पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्याने वर नमुद वाहनचोरी गुन्हा त्याचे ईतर दोन साथीदार पाहिजे आरोपी १) तरूण यशवंत बावणे, वय २४ वर्षे, रा. झाडे चौक, स्वीपर कॉलोनी, शांतीनगर व त्याचा एक मित्र यांचेसह संगणमताने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी केलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे हुडकेश्वर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ११.०८.२०२६ चे २१.०० ते २१.३० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे वडील नामे डोमाजी हरीभाऊ तुरक, वय ६५ वर्षे, रा. मोहाडी, पोस्ट तितुर, तह. कुही, जि. नागपुर हे त्यांचे दुचाकी क्र. एमएच ४० एएस ८५१३ ने फिर्यादीचे घरून गावी जात असतांना, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, उमरेड रोड, विहीरगांव विक्रम ईलेक्ट्रॉनिक दुकानासमोरून जात असतांना, चारचाकी वाहन क्र. एमए. ४० बिजे ५१०६ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे वडीलांचे दुकाचीला मागुन जोरदार धडक देवुन, गंभीर जखमी केले व त्याचे चारचाकी वाहन घटनास्थळी सोडुन पळुन गेला. लोकांनी गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी पंकज डोमाजी तुरक, वय ३७ वर्ष, रा. प्लॉट नं. ६१/ए, बिरसा नगर, दिघोरी, वाठोडा, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. नरेश साखरकर ९३२२२२४२४५ यांनी चारचाकी वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे ईमामवाडा</u> :—** दिनांक ११.०८.२०२६ चे १५.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत, नागपुर—अजनी रेल्वे, इंग्लंड केबीन कडुन धंतोली अंडरब्रिजकडे जाणाऱ्या सिमेंट रोडवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३० वर्षे वयाचे, अंगात रंगबिरंगी फुल बाहीचा शर्ट, निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट व पॅन्टचे आंत लाल रंगाची अंडरवियर घातलेली, गळ्यात धागा व त्यात हिरव्या रंगाचे ताबीज घातलेले, नाकातुन व डाव्या डोळ्याचे भुवईतुन रक्त निघालेले, अशा वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे ईमामवाडा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी केबीन पॉइंट्समन नामे सुनिल बालाजी गुमडेलवार, वय ५५ वर्षे, रा. अजनी रेल्वे कॉलोनी, रेल्वे क्वॉर्टर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. मडावी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी पोनि. जयवंत पाटील ९५९४०००११८ हे करीत आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** अजय गजानन मोहाडीकर, वय ५२ वर्षे, रा. प्लॉट नं. १२०, रमनामारोती नगर, नंदनवन, नागपूर हे दिनांक ३०.०७.२०२६ पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गव्हाळ, चेहरा— लांबट, बांधा— मजबुत, केस— काळे, अंगात— गुलाबी रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे तहसिल</u> :—** मोहम्मद रफिक फिरोज वल्द सिध्दीकी, वय ५२ वर्षे, रा. अन्सार नगर, मोमीनपुरा, तहसिल, नागपूर हे दिनांक ०८.०८.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे तहसिल हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, केस— पांढरे, उंची— ५ फुट ४ इंच, अंगात— पांढऱ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात.



अजय



मोहम्मद

स्वा/–

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.